लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ फिजीकल एज्युकेशन, ग्वालियर या संस्थेच्या शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या पदवी, पदविका, पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांना राज्यात नोकर भरती व इतर सर्व प्रयोजनासाठी मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांशी समकक्षता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः शाशिम-२०१७/प्र.क्र.२०२/मशि-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

तारीख: २३ एप्रिल, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.समक-१०९९/१३४/मशि-४, दिनांक १४ जून, १९९९

२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एसएसएन-२००५/(१२/२००५)/माशि-२, दिनांक ९ जून, २००५.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.आरजीडी-१५११/प्र.क्र.८९/२०११/१३, दिनांक २३ ऑगस्ट, २०११.

४) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एसएसएन-२०११/(२९/११)/माशि-२, दिनांक २१ डिसेंबर, २०११.

प्रस्तावना :-

लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ फिजीकल एज्युकेशन, ग्वालियर ही संस्था केंद्र शासनाच्या क्रीडा व युवकसेवा मंत्रालयाने दिनांक २१.९.१९९५ च्या अधिसूचनेद्वारे युजीसी ॲक्ट, १९५६ च्या कलम ३ नुसार अभिमत विद्यापीठ म्हणून घोषित केलेली संस्था आहे. सदर संस्थेकडून शारीरिक शिक्षणविषयक व क्रीडा शिक्षणाशी संबंधित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदविका यासारखे कोर्सेस चालविण्यात येतात. केंद्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयाकडून सदर संस्थेच्या पदविका व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांना नेताजी सुभाष इन्स्टीट्युट ऑफ स्पोर्टस्, पतियाळा या संस्थेतील पदव्यांशी समकक्ष समजण्याबाबत सर्व राज्यांतील शिक्षण व क्रीडा विभागांना सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार उत्तर प्रदेश राज्याच्या क्रीडा विभागाने लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ फिजीकल एज्युकेशन, ग्वालियर या संस्थेच्या शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांना नेताजी सुभाष इन्स्टीट्युट ऑफ स्पोर्टस्, पतियाळा येथील पदविका अभ्यासक्रमांशी समकक्ष म्हणून मान्यता दिलेली आहे.

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये केंद्रीय किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेल्या पदव्या/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे शैक्षणिक संस्था स्थापित केल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने घोषित केलेल्या मानीव विद्यापीठानी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना समकक्ष दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली, या विद्यापीठातून तसेच, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठातून पूर्ण शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमास

मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वायत्त संस्था व संस्था इत्यादींच्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर पदव्यांना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास (शिक्षण विभाग) मंत्रालयाकडून, केंद्र शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी वेळोवेळी प्रदान केलेली व भविष्यात प्रदान केली जाणारी समकक्षता राज्य शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये मौलाना आजाद उर्दु राष्ट्रीय विद्यापीठ, हैद्राबाद या विद्यापीठातून बी.एड (नियमित)/बी.एड (पत्रद्वारा) उर्दु माध्यम हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या अर्हताप्राप्त शिक्षकांच्या नियुक्ती व पदोन्नतीस मान्यता देण्यात आलेली आहे. या बाबी विचारात घेता, लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ फिजीकल एज्युकेशन, ग्वालियर या अभिमत संस्थेच्या शारीरिक शिक्षण व क्रीडाविषयक अभ्यासक्रमाच्या पदवी, पदविका, पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांना राज्यात नोकर भरती व इतर सर्व प्रयोजनासाठी मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांशी समकक्ष म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ फिजीकल एज्युकेशन, ग्वालियर या अभिमत संस्थेच्या शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या पदविका, पदव्युत्तर पदविका, बीपीएड ४ वर्ष इंटिग्रेटेड, एमपीएड २ वर्ष या अभ्यासक्रमांना राज्यात नोकर भरती व इतर सर्व प्रयोजनासाठी मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांशी समकक्षता प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२३११२३१२६२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hariram V Parhate

Digitally signed by Hariram V Parhate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8bfd656b321bf6c348564562d46cd2934b62b770484625206559a2c204e56cb8, serialNumber=d01f16685aedf1abc9cfd58347280b4c4cb8d304afd1d413884ef4d91aa1462d, cn=Hariram V Parhate
Date: 2018.04.23 11:26:26 +05'30'

(ह. व्यं. पऱ्हाते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
३) सर्व सह संचालक, उच्च शिक्षण (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
५) प्राचार्य, शासकीय व सर्व अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
६) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
७) संचालक, दूर शिक्षा निदेशालय, महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा, ता.जि.वर्धा,
८) निवडनस्ती-मशि-२.